**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः09.09.2024** **वारःसोमवार**

---

**ठळक बातम्या**

- आपला सांस्कृतिक वारसा असलेलं भाषा वैविध्य जतन करण्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं आवाहन
- वारकरी संप्रदायाने समाज घडवण्याचं मोठं कार्य केल्याकचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं प्रतिपादन
- राज्यात सोयाबीन आणि उडीद पिकांसाठी किमान हमीभावानं 90 दिवसांसाठी खरेदी केंद्रं सुरू करायला केंद्र सरकारची मान्यता
- आणि
- पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेची शानदार सोहळ्यात सांगता

**अमित शहा**

आपल्या देशातील भाषावैविध्य हा आपला सांस्कृतिक वारसा आहे; याचं जतन करण्यासाठी प्रत्येकानं घरामध्ये मातृभाषेत बोलावं असं आवाहन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल मुंबईत केलं. मुंबई समाचार या गुजराती भाषक वृत्तपत्राच्या द्विशताब्दीनिमित्त लघुपटाचं प्रदर्शन शहा यांच्या हस्ते झालं; त्यावेळी ते बोलत होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. स्थानिक भाषांचं संवर्धन गरजेचं आहे. त्यासाठीच मातृभाषेतूनच प्राथमिक शिक्षणावर भर देणारं शैक्षणिक धोरण केंद्र सरकारने आणले आहे, असं शहा म्हणाले. भारतीय भाषांमध्ये आदानप्रदान आवश्यक आहे; त्यातूनच भाषा अधिक समृद्ध होणार असल्याचं गृहमंत्री म्हणाले. स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्षात भारत सर्वच क्षेत्रात अग्रस्थानी असेल तसंच भारतीय

अर्थव्यवस्था लवकरच जगात तिसऱ्या क्रमांकावर पोहचेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह कालपासून दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर आहेत. आज दिवसभर ते मुंबईतल्या विविध भागातल्या गणेश मंडळांना भेट देणार आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या या निवासस्थानी जाऊन ते गणपतीचं दर्शन घेणार आहेत.

**मुख्यमंत्री**

राज्यात वारकरी संप्रदायाने समाज घडविण्याचं फार मोठं कार्य केलं आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल आळंदी इथं केलं. वारकरी संत पूजन सोहळ्यात ते बोलत होते. या कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मारुती महाराज कुरेकर यांना शांतिब्रह्म पुरस्कार, तर रामराव महाराज ढोक यांना तुलसीदास पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. यावेळी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले ---

दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल आळंदीत संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीचं दर्शन घेऊन पूजा केली. यावेळी संस्थान समितीच्यावतीने ज्ञानेश्वर महाराजांची प्रतिमा देऊन मुख्यमंत्र्यांचा सत्कार करण्यात आला.

**हमीभाव**

महाराष्ट्रासह कर्नाटकात 90 दिवसांसाठी किमान हमीभावानं सोयाबीन आणि उडीद या दोन पिकांसाठी खरेदी केंद्रं सुरू करायला केंद्र सरकारनं मान्यता दिली आहे. दोन्ही राज्यांमध्ये सोयाबीनची किमान आधारभूत किंमत 4892 रुपये प्रति क्विंटल इतकी निश्चित केली आहे. याबद्दल कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. या निर्णयाबद्दल मुंडे यांनी केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांचे आभार मानले आहेत.

**कर्ज योजना**

शेतमाल तारण कर्ज योजनेमुळे राज्यातील शेतमालाला वाढीव बाजारभाव मिळाल्यामुळे त्याचा मोठ्या प्रमाणात आर्थिक फायदा शेतकऱ्यांना होत आहे. शिवाय बाजार समित्यांच्या उत्पन्नातही वाढ होत असल्याने या योजनेला शेतकरी आणि बाजार समित्यांकडून वाढता प्रतिसाद मिळत आहे. राज्य कृषी पणन मंडळाच्या 2023- 24 या हंगामामध्ये राज्यातील 67 बाजार समित्यांनी शेतमाल तारण कर्ज

योजनेत सहभाग घेतला. त्यामध्ये सुमारे दोन लाख 77 हजार क्विंटलपेक्षा जास्त शेतमाल तारणात स्वीकारला. त्यावर 36 कोटी 34 लाख 24 हजार रुपयांच्या कर्जाचं वाटप शेतकऱ्यांना करण्यात आलं आहे. गेल्या वर्षी या  योजनेत प्रामुख्याने भात, मका, हरभरा आणि तूर या पिकांसह 17 शेतमालांवर कर्जवाटप करण्यात आलं.

**गणेशोत्सव**

राज्यात सर्वत्र गणेशोत्सवाचा उत्साह बघायला मिळत आहे. मुंबई पुण्यासह राज्यातल्या प्रमुख शहरांमधे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या भव्य आणि वैशिष्ट्यपूर्ण गणेशमूर्तींचं दर्शन घेण्यासाठी तसंच सामाजिक संदेश देणारे नेत्रदीपक देखावे पाहण्यासाठी अबल वृद्धाची गर्दी होत आहे. दरम्यान, दीड दिवसाच्या गणपतींच विसर्जन काल झालं. यासाठी ठिकठिकाणी स्थानिक प्रशासनानं आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. विसर्जन घाटांवर तसंच अन्य ठिकाणीही कृत्रिम विसर्जन हौदांची व्यवस्था करण्यात आली आहे. उद्या घरोघरी ज्येष्ठा गौरीचं आगमन होणार आहे; त्यांच्या स्वागतासाठी घराघरात जय्यत तयारी सुरू आहे.

**रथोत्सव**

सांगली जिल्ह्यातील तासगाव इथं श्री गणपती पंचायतन देवस्थानचा 245वा रथोत्सव काल हजारो गणेश भक्तांच्या उपस्थितीत पार पडला. या रथोत्सवाची सुरुवात इसवीसन 1779मध्ये संस्थापक श्रीमंत परशुरामभाऊ रामचंद्रपंत पटवर्धन यांनी केली. हा रथ श्री गणपती मंदिर ते काशी विश्वेश्वर मंदिरापर्यंत भाविक ओढत घेऊन जातात. या रथोत्सवासाठी राजेंद्रसिंह पटवर्धन यांच्यासह राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई, माजी खासदार संजय पाटील, रोहित पाटील आदि  उपस्थित होते.

**योजना दूत**

राज्य शासनाच्या माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयामार्फत मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम राबविण्यात येत आहे. प्रत्येक ग्रामपंचायत पातळीवर एक तर शहरी भागात प्रत्येक पाच हजार लोकसंख्येमागे एक अशा पद्धतीने राज्यात 18 ते 35 वयोगटातील एकंदर  50 हजार योजनादूतांची सहा महिन्यांसाठी निवड केली जाणार आहे. या योजनादूतांना दरमहा 10 हजार रूपये मानधन दिल जाणार असून, उमेदवारांनी शासनाच्या संकेतस्थळावर अर्ज करण्याची शेवटची तारीख 13 सप्टेंबर

आहे. याअंतर्गत यवतमाळ जिल्ह्यात 1444, पालघर जिल्ह्यात  1851; तर परभणी जिल्ह्यात  972 योजनदूतांची नियुक्ती करण्यात येणार आहे.

**बीसीजी लस**

पुणे जिल्हयात क्षयरोगाचं उच्चाटन करण्यासाठी 18 वर्षावरील नागरिकांना आता बीसीजीची लस देण्यात येणार आहे. त्यासाठी लसीकरण मोहिमेला सुरूवात झाली असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर सचिन देसाई आणि क्षयरोग अधिकारी डॉक्टर विकास वडगाये यांनी दिली. यासाठी जिल्हयातील सात लाख 50704 जणांची नोंद करण्यात आली. चार लाख 32232 जणांनी लस घेण्यासाठी संमती दिली आहे.  लहान मुलांना दिली जाणारी बीसीजी लस क्षयरोगासह इतर आजारांविरोधातही परिणामकारक ठरल्याचं संशोधनातून सिध्द झालं आहे.

**धारशिव**

सामाजिक अन्याय दूर करण्यासाठी संविधानाचं मार्गदर्शन आवश्यक आहे; असं प्रतिपादन आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते आणि जलभूमी व्यवस्थापन संस्था छत्रपती संभाजी नगरचे माजी प्रमुख डॉक्टर रमेश पांडव यांनी केलं. ते काल धाराशिव इथं भारतीय संविधान आणि सामाजिक न्याय या विषयावर व्याख्यानात बोलत होते. भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त अखिल भारतीय अधिवक्ता परिषदेच्या वतीने यांच आयोजन केलं होते.

**स्वच्छहवा दिवस**

चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे नुकताच राष्ट्रीय स्वच्छ हवा दिवस कार्यक्रम, वृक्षारोपण कार्यक्रमाद्वारे साजरा करण्यात आला.  केंद्र शासनाच्या एक पेड माँ के नाम वृक्षारोपण मोहिमेअंतर्गत नाना नानी उद्यान इथ आयुक्त विपीन पालीवाल यांच्या हस्ते वृक्ष लावून स्मृतिवन बनविण्यास सुरवात करण्यात आली. ज्याप्रमाणे आपण आपल्या आईची काळजी घेतो त्याचप्रमाणे या वृक्षाची काळजी घेण आवश्यक असल्याचे आयुक्त पालीवाल यांनी सांगितल.

**हॉकी**

पुण्यात सुरू असलेल्या वरिष्ठ पुरुष गटाच्या चौथ्या हॉकी इंडिया आंतरविभागीय राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत गतविजेता पेट्रोलियम स्पोर्ट्स प्रमोशन बोर्ड संघ उपांत्यपूर्व फेरीसाठी पात्र ठरला. रेल्वे स्पोर्ट्स

प्रमोशन बोर्ड संघानेही अंतिम 8 संघांतील स्थान निश्चित केलं. अखिल भारतीय पोलीस क्रीडा नियंत्रण मंडळाने या स्पर्धेतील आतापर्यंतच्या सर्वोत्तम निकालाची नोंद केली. आकाशदीपच्या 8 गोलच्या जोरावर त्यांनी स्पोर्ट्स अथॉरिटी ऑफ गुजरात – हॉकी अकादमीचा 17 - 2 असा मोठ्या फरकाने पराभव केला.

**पॅरालिम्पिक समारोप**

पॅरिस पॅरालिम्पिक क्रीडा स्पर्धांचा काल रात्री शानदार सोहळ्यात समारोप झाला. फ्रेंच इलेक्ट्रॉनिक म्युझिक सीनमधील चोवीस कलाकारांनी स्टेड डी फ्रान्स इथं मुसळधार पाऊस असूनही यावेळी या स्पर्धेत सहभागी झालेले जगभरातील 4 हजार 400 खेळाडू उपस्थित होते. पुढील पॅरालिम्पिक स्पर्धा 2028 मध्ये अमेरिकतील लॉस एंजेलिस इथं होणार असून पॅरालिम्पिक ध्वज लॉस एंजेलिसच्या महापौर कॅरेन बास यांच्याकडं सुपूर्द करण्यात आला. यंदाच्या स्पर्धेत भारतीय संघानं आपली सर्वोत्तम कामगिरी करून 7 सुवर्ण, 9 रौप्य आणि 13 कांस्य अशी एकंदर 29 पदकं मिळवली.

**पॅरालिम्पिक**

दरम्यान पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आनंद व्यक्त केला आहे. या खेळाडूंच्या यशोगाथा देशातल्या तरुणांना प्रेरणा देतील, असंही राष्ट्रपती मुर्मू यांनी त्यांच्या समाज माध्यमावरील शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

**पाऊस**

सांगली जिल्ह्यातील तासगाव, पलूस, वाळवा आणि मिरज तालुक्यात काल जोरदार पाऊस पडला.

**हवामान**

राज्यात येत्या 24 तासात कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी, तर विदर्भात अनेक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली. या काळात कोकणात आणि घाट विभागात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं; नमस्कार.**